16-04-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 04/15/2025 10:44 PM Page 1



# शिक्षकांचे योगदान कायम लक्षात ठेवा

## अधिकारी गिरीश बैलुडकर : साखळी महाविद्यालयात पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**साखळी : उत्तर गोव्याचे वन परिक्षेत्र अधिकारी गिरीश बैलुडकर यांचा रोपटे देऊन सन्मान करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस.**

**साखळी, दि. १५** : साखळी सरकारी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी ही माझी ओळख माझ्यासाठी अभिमानास्पद असून माझ्या जडणघडणीत या महाविद्यालयाचा मोठा वाटा आहे. विद्यार्थ्यांनी सतत शिकत राहावे, तसेच वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात नैतिक आचरण ठेवावे. आपले व्यक्तिमत्त्व घडविण्यात शिक्षकांनी दिलेले योगदान विद्यार्थ्यांनी कायम लक्ष्यात ठेवावे व यश मिळविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन उत्तर गोव्याचे वन परिक्षेत्र अधिकारी गिरीश बैलुडकर यांनी केले.

कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळी येथे आयोजित केलेल्या पारितोषिक वितरण सोहळा आणि पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ सोहळ्यातील प्रमुख पाहुणे या नात्याने वन परिक्षेत्र अधिकारी गिरीश बैलुडकर बोलत होते.

यावेळी मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस, पदव्युत्तर विभागाचे उपप्राचार्य शरत जमखंडी, शैक्षणिक विभागाच्या उपप्राचार्या प्रीती पेडणेकर, प्रशासकीय विभागाच्या उपप्राचार्य रोझालिना डिसिल्वा, विद्यार्थी कल्याण समितीचे संयोजक डॉ. सागर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांनी मान्यवरांचे स्वागत करून वार्षिक अहवालाचे वाचन केले. प्रमुख पाहुणे गिरीश बैलुडकर यांची ओळख उपप्राचार्य शरत जमखंडी यांनी करून दिली. कृतिका नावेलकर यांनी सूत्रसंचालन केले तर आभार डॉ. सागर पाटील यांनी मानले. अंकुश सिनारी, गॉर्डन पायरस, रोहिणी कमलाकर, अभिषेक मिश्रा या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामुळे झालेला लाभ आणि शिक्षकांबद्दलची कृतज्ञता आपल्या मनोगतातून व्यक्त केली.

**महाविद्यालयाची यशस्वी घोडदौड : गावस**

साखळी सरकारी महाविद्यालयाने कला, क्रीडा, एनएसएस, एनसीसी आणि शैक्षणिक पातळीवरही स्वत:चा नावलौकिक उमटवला असून महाविद्यालयाची यशस्वी घोडदौड येणाऱ्या काळातही कायम अशीच चालू राहील, असे महाविद्यालयाच्या वार्षिक कामगिरीचा आढावा घेताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांनी सांगितले.

सर्वोत्कृष्ट सर्वगुण संपन्न विद्यार्थी पुरस्कार – रिफा शेख, साईश गावडे, नुरेन शाह, माधवराज परब, गॉर्डन पायरस, प्रियांका कोटेकर, भावार्थ धोंड, आस्मा मुजावर, वैष्णवी गावस. सर्वोत्कृष्ट ग्रंथालय वापरकर्ता पुरस्कार धनश्री जाधव. सर्वोत्कृष्ट मंडळ सदस्य पुरस्कार–सुजल शिरोडकर आणि यश शेट्ये. सर्वोत्कृष्ट एनएसएस स्वयंसेवक पुरस्कार–शिवम चोडणकर, सर्वोत्कृष्ट एनसीसी कॅडेट पुरस्कार–एसयुवो आस्मा मुजावर, सर्वोत्कृष्ट आउटगोइंग विद्यार्थी पुरस्कार–आस्मा मुजावर, सर्वोत्कृष्ट खेळाडू आणि क्रीडा महिला पुरस्कार आर्यन साळुंखे आणि सेजल नाईक यांना प्राप्त झाला.




## 'साद तुला' चारोळीसंग्रहाचे प्रकाशन

**टीम दैनिक हेराल्ड**

पेडणे, दि. १५ : म्हापसा येथील कवियत्री वर्षा मिलिंद नार्वेकर (राधामिलिंद) यांच्या 'साद तुला' या मराठीतील दुसऱ्या चारोळी संग्रहाचे प्रकाशन स्नेहसेवा वृद्धाश्रमाच्या संचालिका तथा माजी नगरसेविका सारिका पेडणेकर यांच्या हस्ते झाले. नानेरवाडा–पेडणे येथे व्हायकाउंट हायस्कूल परिसरात असलेल्या स्नेहसेवा ज्येष्ठ नागरिक वृद्धाश्रम संकुलाच्या आवारात हा कार्यक्रम झाला.

साहित्यिक सुदेश आर्लेकर यांच्या जागर प्रकाशन, गोवा' या संस्थेतर्फे प्रकाशित करण्यात आले असून, प्रकाशन सोहळ्याचे आयोजन जायंटस ग्रूप ऑफ खोर्ली स्मार्ट सहेली'च्या वतीने करण्यात आले होते. प्रकाशन सोहळ्यावेळी जागर प्रकाशन, 'गोवा' चे मानद संचालक सुदेश आर्लेकर, कवयित्री वर्षा मिलिंद नार्वेकर (राधा मिलिंद), कवयित्री मंजिरी टोपले, जायंटस ग्रूप ऑफ खोर्ली स्मार्ट सहेली'च्या अध्यक्ष रेश्मा मठकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

स्नेहसेवा वृद्धाश्रमाच्या क्रियाशील युवा कार्यकर्त्या आहाना शेट्ये यांनी या प्रकाशन सोहळ्यानिमित्त आगळ्यावेगळ्या केक स्वरूपात तयार केलेल्या 'साद तुला' या चारोळी पुस्तकाचा स्वादही उपस्थितांना घेता आला.

# कुडणेतील कुडणेश्वराचा उद्या जत्रोत्सव

## गोबी मंच्युरियन दुकानांवर बंदी : मुख्य रस्त्याच्या दुतर्फा दुकानांना मज्जाव : देवस्थान समितीची माहिती

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**डिचोली – पत्रकार परिषदेत माहिती देताना कुडणेश्वर देवस्थान समितीचे अध्यक्ष अतुल मळीक. सोबत समितीचे इतर पदाधिकारी.**

**डिचोली, दि. १५** : कुडणे साखळी येथील श्री देव कुडणेश्वरचा प्रसिद्ध होमकुंड जत्रोत्सव गुरुवार, दि. १७ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या जत्रोत्सवाची तयारी युद्धपातळीवर सुरू असून यावर्षी या जत्रोत्सवात गोबी मंच्युरियनच्या दुकानांवर बंदी आलण्यात आली आहे. या संदर्भात अन्न व औषध प्रशासनाला देवस्थान समितीतर्फे पत्र पाठवण्यात आले आहे. त्याचबरोबर गावात येणाऱ्या मुख्य रस्त्याच्या दुतर्फा दुकाने थाटण्यास मज्जाव करण्यात आला आहे, अशी माहिती अशी देवस्थान समितीचे अध्यक्ष अतुल मळीक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुडणे हा एक उत्सवप्रिय गाव असून या गावाला धार्मिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे. या ऐतिहासिक गावात अनेक उत्सव साजरे केले जातात व त्या उत्सवांमध्ये गावातील सर्व लोक सहभागी होऊन या गावाच्या एकतेचे दर्शन घडवतात. या गावातील होमकुंड जत्रोत्सव हा सर्व उत्सवांचा परमोच्च बिंदू असून या जत्रोत्सवाची तयारी संपूर्ण गावात सुरू आहे. या जत्रोत्सवात गेल्यावर्षी प्रमाणे यावर्षीही गोबी मंच्युरियनच्या दुकानांवर बंदी घातली आहे. तसेच जत्रोत्सवास येणाऱ्या लोकांना त्रास होऊ नये व सुरळीतपणे येता यावे यासाठी गावात येणाऱ्या मुख्य रस्त्याच्या दुतर्फा दुकाने थाटण्यास दिली जाणार नाही. याकडे देवस्थान समिती गांभीर्याने लक्ष देणार, असेही अध्यक्ष मळीक यांनी सांगितले.

दि. १७ रोजी सकाळी पहाटे ५.३० ते दु. १ या वेळेत मूर्तीस अभिषेक होईल. संध्याकाळी ४ वा. नवीन धोंडगणांना मानवून घेतले जाणार आहे. ५ वा. श्री सातेरी देवीला बाल धोंडगणांसह ओटीचा मान अर्पण केला जाईल. ६ वा. श्रींचे सातेरी देवीच्या मंदिराजवळ तळीवर स्नानासाठी आगमन होईल. यावेळी सुहासिनींतर्फे देवीची ओटी भरण्यात येईल. रात्री ११ वा. हरवळे येथून देव रूद्रेश्वराकडून देवाला भेट म्हणून आलेली ओटी, फुले व फळे स्विकारण्यात येणार. पहाटे २ वा. होमकुंडाला मंत्राग्नी देऊन देवीचे भक्तगणांसह स्नानासाठी तळीवर प्रस्थान होईल. पहाटे ४ वा. श्री देव रवळनाथ व देवी महालक्ष्मीचा कृपाप्रसाद घेऊन धोडगणांचे होमकुंडाच्या अग्नीदिव्यातून मार्गक्रमणास सुरुवात होणार तर पहाटे ५.३० वा. देवीचा अग्निदिव्यातून प्रवेश होणार व नंतर मंडपात सर्वांसाठी कौलप्रसादचा कार्यक्रम होईल.

जत्रोत्सवानंतर चार दिवस श्री कुडणेश्वर मंदिराच्या प्रांगणात विविध संस्कृती कार्यक्रम सुरूच असतील. शुक्रवार दि. १८ रोजी रात्री १०.३० वा. संगीत जयंद्रथ विडंबन हे नाटक सादर होईल. शनिवार दि. १९ रोजी रात्री १०.३० वा. संगीत सावता माळी हे नाटक सादर होणार आहे. रविवार दि. २० रोजी रात्री १०.३० वा. 'फुक्या सोवाय' हे नाटक सादर होईल. सोम. दि. २१ रोजी रात्री १० वा. ऑर्केस्ट्रा सादर केला जाणार आहे, अशी माहिती देवस्थान समितीचे सचिव गणराज मळीक यांनी दिली.



**साखळी : रस्ता रुंदीकरण कामाचा शुभारंभ करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत नगराध्यक्ष सिद्धी प्रभू, आनंद काणेकर, दयानंद बोर्येकर व इतर.**

# साखळीतील रस्ते होणार चौपदरी

▶ **मुख्यमंत्र्यांची माहिती : मास्टर प्लॅन तयार**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १५** : सांखळी नगरपालिका आणि गोवा सरकारच्या वतीने स्वच्छ साखळी आणि सुंदर साखळी संकल्प अंतर्गत पूर्ण मास्टर प्लॅन तयार केलेला आहे. या मास्टर प्लॅन अंतर्गत साखळीतील रस्त्यांचे रुंदीकरण आणि सौंदर्यीकरण करून चौपदरी करण्यत येतील. त्यामुळे साखळीचा आधुनिक विकास दिसून येणार असल्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी सांगितले.

साखळी शहरात विविध रस्ते चौपदरी होणार असून त्या कामाचा कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री आणि स्थानिक आमदार डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी नगराध्यक्ष सिद्धी प्रभू, उपनगराध्यक्ष आनंद काणेकर, दयानंद बोर्येकर, इतर नगरसेवक, अधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

सुरवातीला साखळी बसस्थानक ते शिवाजी पुतळ्याजवळच्या रस्त्याचे काम हाती घेतले जाणार आहे. त्यानंतर आरोग्य केंद्र ते होंडा पुलापर्यंतचा रस्ता चौपदरी करण्यात येणार आहे. या कामाला पूर्ण होण्यास सुमारे दीड ते दोन वर्ष लागतील, असे मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी सांगितले.

साखळी शहर देशातील आदर्श शहर व्हावे, यासाठी अनेक योजना मार्गी लागत आहेत. आधुनिक सुविधा क्रीडा कला आरोग्य शिक्षण याबरोबरच अनेक नवे उपक्रम सुरू आहेत. साखळी शैक्षणिक हब म्हणून नावारूपास येत असून या ठिकाणी अनेक शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. केजी ते पिजी पर्यंत शिक्षण व्यवस्था आहे. आता मास्टर प्लानच्या माध्यमातून आधुनिक विकास साधला जाईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

# साखळी महाविद्यालयात युपीएससी परीक्षेविषयी मार्गदर्शन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

▶ **रसायनशास्त्र विभागाचा पुढाकार; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

**साखळी, दि.१५** : कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळी येथील रसायनशास्त्र विभाग आणि गोवा विद्यापीठातील विद्यार्थी प्लेसमेंट आणि माजी विद्यार्थी संबंध संचालनालयाच्या करिअर समुपदेशन सेलच्या सहकार्याने महाविद्यालयातील तृतीय वर्ष विद्यार्थी व माजी विद्यार्थ्यांसाठी युपीएससी परीक्षेविषयी मार्गदर्शन आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केलेला होता. राज्यातून अधिकाधिक आएएस, आयपीएस आणि आयएफएस अधिकारी घडविणे हा या प्रशिक्षण कार्यक्रमाचा हेतू होता. त्यानिमित्ताने गोवा विद्यापीठातील विद्यार्थी प्लेसमेंट आणि माजी विद्यार्थी संबंध संचालनालयाच्या करिअर समुपदेशन सेलच्या टीमने महाविद्यालयाला भेट देऊन वेगवेगळ्या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी गोवा विद्यापीठातील विद्यार्थी प्लेसमेंट आणि माजी विद्यार्थी संबंध संचालनालयाचे संचालक डॉ. रुपेश पात्रे, करिअर समुपदेशन सेलचे अध्यक्ष अरविंद एन हळदणकर, डॉ. म्रिदिनी गावस आणि यूपीएसी ओरिएंटेशन प्रोग्रामचे नोडल अधिकारी डॉ. सागर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.


**CHANGE IN NAME**

I, RAHINA BEE, r/o H.NO. 360, Housing Board Colony, Davorlim, Navelim, Salcete, South Goa - 403707. Have changed my name from RAHINA BEE AGA to RAHINA BEE, Hereafter in all my dealings, Documents & ID Proofs, I will be known by the name RAHINA BEE.

sd/-
RAHINA BEE

**NOTICE**

My Husband **Late Suchendra Naik** was owning **Honda Activa SCV110E Scooter** bearing **Reg. No. GA-06-J-9774 & Bajaj Platina 100 ES Motorcycle** bearing **Reg. No. GA-06-Y-3303.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

Sd/- **Smt. Chandani Suchendra Naik**
H. No. 234, Nr. Bramhastal, Pandarang Wadi, Baina, Vasco Da Gama, Goa.
**Date: 15.4.2025**

Sandeep Ads

**CHANGE OF NAME**

I, **CUSTODIO FRANCISCO DE SOUZA** Resident of Novo Bazar Macazana, Salcete Goa has change my name from **CUSTODIA FRANCISCO D SOUZA** to **CUSTODIO FRANCISCO DE SOUZA** Hereinafter in all my dealings and documents, I will be known by new name of as **CUSTODIO FRANCISCO DE SOUZA.**

**CHANGE OF NAME**

I, **JOAQUIM CARDOZ**, holder of Passport No. B6043714, r/o. Flat 1-Carlen Bldg., St. Mary's Colony, Opp. Law College, Miramar, Panjim, Goa - 403001, do hereby change my name to **JOAQUIM CARDOZO** for all purposes.
I will henceforth be known in the name **JOAQUIM CARDOZO** and I also undertake to carry out this name change in all my documents.

romeo ads

**Village Panchayat Cotigao, Canacona Goa**

Ref. No. VPC/CAN/TENDER-NOTICE/2025-2026/26 **TENDER NOTICE** Date: 11/04/2025

The Village Panchayat Cotigao, Canacona Goa invites sealed percentage rate tenders form for below mentioned work from approved and eligible contractors registered with State PWD/Goa registered in appropriate class of Goa PWD/CPWD as per below mentioned schedule.

| Sr. No. | Name of work | Estimated Cost put to bid (RS) | EMD (Rs.) | Time limit | Cost of tender forms (Rs) | Class of contractor (As per New Registration) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | Construction of Gutter from near the house of Shri. Premanand Ram Gaonkar to main Road at Yeda in Village Panchayat Cotigao Canacona Goa . | 478477.32 | 9570.00 | 60 Days | 4000.00 | Class V & Above RBLD |
| 2 | Construction of Retaining Wall near the house of Shri. Laxman Poro Velip to near the house of Shri. Dayanand Sangtu Velip at Madheshiwada Avali in V.P. Cotigao Canacona Goa. | 424057.29 | 8481.00 | 60 Days | 4000.00 | Class V & Above RBLD |
| 3 | Construction of Protection Wall & road side Gutter near Anandu Mainath house at Avem in V.P. Cotigao Canacona Goa. | 482787.06 | 9656.00 | 60 Days | 4000.00 | Class V & Above RBLD |

**THE TERMS AND CONDITIONS ARE AS UNDER : 1.** E.M.D. should be deposited in form of DD/Pay order in the name of "Sarpanch V.P. Cotigao" and the same to be enclosed along with the Tender Forms. **2.** Application for issue of tender forms should reach to this office on or before **28/04/2025 up to 4.00 pm.** alongwith **3.** The date of payment of tender forms is **30/04/2025 up to 12.00 P.M. 4.** Date of issue of blank tenders forms is **05/05/2025 upto 4.00 P.M. 5.** Date of submission of tenders to this Panchayat is **07/05/2025 upto 12.30 PM.** and the same will be opened on the same day at **3.00 P.M 6.** The application for tender forms should enclose attested copies of valid relevant contract licence, Income Tax/Pan Card, GST Registration Certificate and acknowledgement of up to date filed returns with ARN (Application reference Number generated on GST common portal). **7.** The defaulter of this Panchayat to execute the Panchayat construction works is not liable to apply for tender forms. **8.** A declaration of the works in hand shall be submitted with detailed list, indicating their present status on Rs. 100/- stamp paper, However tender form will not be issued to the person who has work's in hand more than 4 times the tendering limits. **9.** For the tenders/ items of tender in case of being quoted abnormally below i.e 20% below the estimated cost then the contractor shall furnish on demand an additional performance security in the form of bank guarantee from national/schedule bank for that amount which is worked out as difference between quoted amount and reasonable amount reduced by 20%. **10.** The Panchayat reserves rights to accepts or reject any or all the tenders without assigning any reason thereof.

Seal

Sd/- Sarpanch, Village Panchayat Cotigao Canacona


# कोहा एकात्मिक ग्रंथालय प्रणालीवर कार्यशाळा उत्साहात

▶ **गोवा ग्रंथपाल संघटनेचा पुढाकार; ज्ञानप्रसारक मंडळ कॉलेज आसगाव येथे आयोजन**

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**म्हापसा, दि. १५** : गोवा ग्रंथपाल संघटनेने ज्ञानप्रसारक मंडळ कॉलेज आणि संशोधन केंद्राच्या सहकार्याने कोहा(घेहर) एकात्मिक ग्रंथालय प्रणालीवर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन ज्ञानप्रसारक मंडळ कॉलेज आणि संशोधन केंद्र आसगाव येथे केले होते. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रंथालयाशी निगडित घटकांचे सक्षमीकरण करणे हा या कार्यशाळेचा मुख्य हेतू होता.

या कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञानप्रसारक मंडळ कॉलेज आणि संशोधन केंद्राचे प्राचार्य प्रो.डी.बी.आरोलकर तर सन्मानीय अतिथी म्हणून गोवा विद्यापीठाचे ग्रंथपाल डॉ. संदेश देसाई उपस्थित होते.

कार्यशाळेच्या सुरुवातीला गोवा ग्रंथपाल संघटनेचे अध्यक्ष डॉ. बाळा मांद्रेकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले. डॉ.शोभा कारेकर यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन प्रा. माया कार्व्हालो यांनी केले तर आभार ज्ञानप्रसारक मंडळ कॉलेज आणि संशोधन केंद्रातील ग्रंथपाल आणि गोवा ग्रंथपाल संघटनेचे सचिव डॉ. जयप्रकाश यांनी मानले. कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात पीएचडी प्राप्त केलेल्या ग्रंथपालांचा सत्कार आणि गुणगौरव करण्यात आला. यामध्ये डॉ. बाळा मांद्रेकर, डॉ. नितेश नाईक, डॉ. सरिता तिरोडकर, डॉ. रूपा कामत, डॉ. विंदा नाईक यांचा समावेश होता. तर नुकत्याच निवृत्त झालेल्या ग्रंथपाल अंजली भिडे यांच्या प्रशंसनीय कामगिरीची दखल घेत सत्कार करण्यात आला.

**डॉ. केशव धुरी यांचा विशेष सन्मान**

उच्च शिक्षण संचालनालयाचे सहायक संचालक डॉ.केशव धुरी यांना कला आणि संस्कृती खात्यार्ते उत्कृष्ट ग्रंथपाल हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान शाल आणि स्मृतिचिन्ह देऊन गोवा ग्रंथपाल संघटनेतर्फे यावेळी करण्यात आला.

कार्यशाळेत प्राचार्य प्रो.डी.बी.आरोलकर यांनी हरवत चाललेली वाचन संस्कृती पुनर्जिवित करण्यासाठी ग्रंथालयांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. गोवा विद्यापीठाचे ग्रंथपाल डॉ. संदेश देसाई म्हणाले की, विद्यार्थी अनुकूल आधुनिक ग्रंथालय परिसंस्था विकसित करण्यासाठी ग्रंथपाल आणि शिक्षक यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. दैनंदिन ग्रंथालय कामकाज व्यवस्थापित करण्यासाठी कोहा तंत्रज्ञानाचा व्यापकपणे वापर केला जात असून ग्रंथपालांसाठी कोहा तंत्रज्ञान अत्यंत महत्त्वाचे आहे, असे उच्च शिक्षण संचालनालयाचे सहाय्यक संचालक डॉ.केशव धुरी यांनी सांगितले. संसाधन तज्ज्ञ मुख्य मार्गदर्शक सागर सरवारी यांनी कोहाच्या प्रगत वैशिष्ट्यांवर सविस्तर आणि अभ्यासपूर्ण सत्र सादर केले. यामध्ये कोहा तंत्रज्ञानाचा वापर दैनंदिन कामकाजात कसा करावा, यावर भर देण्यात आला.

# परिश्रमातून मिळालेले यश खूप महत्त्वाचे

## नितीन रायकर : ज्ञानमंदिर हायस्कुलमध्ये विद्यार्थ्यांचा गौरव

■ *टीम दैनिक हेराल्ड*




**केरी–सत्तरी : येथील विवेकानंद ज्ञान मंदिर हायस्कुलमध्ये गौरविण्यात आलेल्या दहावीच्या मुलांसोबत नितीन रायकर, देवयानी गावस, सुप्रिया गावस, नामदेव गावस व इतर.**

**साखळी, दि. १५** : आपण सदैव चांगल्या व्यक्तींचा व चांगल्या कामाचा आदर्श घेतला पाहिजे.जीवनात यशस्वी होण्यासाठी अथक प्रयत्न करणे गरजेचे असते. अथक परिश्रमातून मिळालेले यश हे खूप महत्त्वाचे असते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी अथक प्रयत्न करून यश संपादन केले पाहिजे, असे प्रतिपादन अग्निशामक दलाचे संचालक नितीन रायकर यांनी केले.

केरी–सत्तरी येथील स्वामी विवेकानंद स्मृती संघ संचालित विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद ज्ञानमंदिर हायस्कुलात आयोजित केलेल्या विद्यार्थी गौरव सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या तसेच यंदाच्या ऑलंपियाड परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर केरी जिल्हा पंचायत सदस्य देवयानी गावस, सरपंच सुप्रिया गावस, पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्ष नंदा ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष नामदेव गावस, सचिव शिवाजी गाड, व्यवस्थापक दिनेश माईणकर, प्रभारी मुख्याध्यापक गोपीनाथ गावस आदी उपस्थित होते.

दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सिंथिया फर्नांडिस यांनी ओळख करून दिली. नामदेव गावस यांनी स्वागत केले. गोपीनाथ गावस यांनी प्रास्ताविक केले. विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मान्यवरांना फुलांची रोपटी देऊन स्वागत केले.

यावेळी शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या तसेच ऑलंपियाड परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. तसेच यावेळी 'ज्ञानवेद' या स्मरणिकेचे विमोचन करण्यात आले.

यावेळी देवयानी गावस म्हणाल्या की, जीवनात शिस्त बाळगली पाहिजे. शिस्तीने काम केल्यास ते लवकर साध्य होते. विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे , पालकांचे ऐकावे. त्यांचा सदैव सादर राखावा. आपले चारित्र्य चांगले ठेवावे. सुप्रिया गावस म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी चांगले काम करून आपल्या पालकांचे, शिक्षकांचे नाव उज्वल केले पाहिजे. आपल्या शाळेचा अभिमान बाळगला पाहिजे. चांगल्या व्यक्तींचा आदर्श घेतला पाहिजे.

यावेळी मान्यवरांना संस्थेचे अध्यक्ष नामदेव गावस यांच्या हस्ते सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरवी गावस यांनी केले तर जयराम परब यांनी आभार मानले.